

'अस्सा नवरा नको गं बाई' या झाडीपट्टीच्या नाटकातील एक प्रसंग.

# बम्म जमलं ना गा...

कै. राम गणेश गडकरी नाट्यनगरी, नागपूर

'एण्ट्री कशी दमदार पाहिजे... नंतरचा बार फुसका ठरला तरी चालते...' हा 'अस्सा नवरा नको गं बाई' या झाडीपट्टीच्या नाटकातील एक संवाद प्रयोगाला साजेसा असाच ठरला. मध्यरात्रीनंतर सुरू झालेल्या प्रयोगाला नागपूरकर रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. एवढेच काय, तर नाटकाच्या शेवटी अख्ख्या सभागृहाने उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करीत कलावंतांना दाद दिली. त्यामुळे कलावंत भरून पावले.

सदानंद बोरकर लिखित, दिग्दर्शित हे नाटक झाडीपट्टीचे म्हणावे का, हा खरा प्रश्न आहे. खरेतर, झाडीपट्टीची व्याख्या बदलण्याचा प्रयत्न यानिमित्ताने झालेला दिसला. एरवी, झाडीपट्टीत नेपथ्य असतेच असे नाही. पडदे लावून प्रसंग पुढे केले जातात. मात्र, नवरगावच्या या कलावंतांचा प्रयोग वेगळा आहे. येथे कथानकाला साजेसा अख्खा सेट उभा दिसतो. 'पॉलिश्ड झाडीपट्टी' असाच या नाटकाचा उल्लेख करावा लागेल. त्यातल्या त्यात सुरेश भट सभागृहाचा भलामोठा रंगमंच या कलावंतांना मिळाला, हीसुद्धा एक जमेची बाजू ठरली. नाटकातील 'पंचेस' ही सर्वात वैशिष्ट्यपूर्ण बाब ठरली. झाडीपट्टी आणि प्रमाण भाषेची सांगड असलेले हे नाटक रसिकांना चांगलेच भावले. टाळ्या, शिट्ट्या अन् हशांनी त्याची पावती मिळाली.

दोन मुली आणि एका मुलीचा बाप पारंपरिक विचार करणारा. मात्र, ही मुले त्याची विचारसरणी बदलण्यात यशस्वी ठरतात. त्यासाठी 'जावई' मदत करतो, अशी ही कथा आहे. विनोदाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम हे नाटक करते. यात विजय मुळे, मंजुषा जोशी, विश्वनाथ पर्वते, कमलाकर कामडी, देवयानी जोशी, शिल्पा माडले, अंगराज बोरकर, चंद्रसेन लंजे यांनी आपापल्या भूमिकांना योग्य न्याय दिला. छाया प्रकाश दिवाकर बोरकर, पार्श्वसंगीत लक्ष्मीकांत लेंझे यांचे होते. नेपथ्य सदानंद बोरकर यांचे होते.

### रात्रभर वर्दळ

आदल्या पहाटे अस्सल झाडीपट्टीचा फ्लेवर 'आक्रोश'ने दिला. त्यानंतर 'अस्सा नवरा नको गं बाई' हेही नाटक उत्तररात्री दोन वाजेनंतरच सुरू झाले. प्रेक्षकांची गर्दी वाखाणण्याजोगी होती. एरवी शांत असलेल्या रेशीमबागने रात्रभर रसिक आणि कलावंतांची वर्दळ अनुभवली.



रविवारी मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास 'अस्सा नवरा नको गं बाई' हे झाडीपट्टीतील नाटक सुरू झाले. त्यासाठी झालेली गर्दी पहाटे पाच वाजतापर्यंत कायम होती.